# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०– २५६२११५६
२५६२११५७
२५६२११६१
२५६२११६३

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
ईमेल : approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/ ३५८९

दिनांक : १८/१२/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित अशासकीय (अनुदानित) महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय : कॅस अंतर्गत प्राध्यापक पदांच्या मुलाखतीबाबत...
संदर्भ : १) या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र. सीसीओ/५२०, दि. २४/२/२०२० रोजीचे पत्र
२) या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र. सीसीओ/३५४६, दि. १२/१२/२०२० रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील सर्व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील पात्र सहयोगी प्राध्यापकांकडून कॅस अंतर्गत पदोन्नती मिळण्यासाठीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने उपरोक्त संदर्भीत पत्रान्वये मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जातील पात्र उमेदवारांच्या कॅस अंतर्गत प्राध्यापक पदांच्या मुलाखतीचा कार्यक्रम सोबतच्या तपशीलाप्रमाणे दि. २२/१२/२०२० ते २८/१२/२०२० या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे– ७ या ठिकाणी आयोजित केला आहे. तरी आपणास सूचित करण्यात येते की, आपण सदरची बाब आपल्या महाविद्यालयातून या पदासाठी अर्ज केलेल्या पात्र सहयोगी प्राध्यापकांच्या निदर्शनास आणून देऊन मुलाखतीच्या दिवशी संबंधित उमेदवार, विभागप्रमुख, संस्था प्रतिनिधी व आपण स्वत: दिलेल्या वेळेस उपस्थित रहावे ही विनंती. ज्या संस्थेचे पदाधिकारी या निवड समितीच्या सभेसाठी उपस्थित राहू शकत नाही, अशा संस्थेनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांना संस्था प्रतिनिधी म्हणून प्राधिकृत केल्यास तसे पत्र सादर करावे लागेल.

नोंदणी केलेल्या अर्जांपैकी जे सहयोगी प्राध्यापक मुलाखतीच्या दिवशी संबंधित **महाविद्यालयाच्या सेवेत कार्यरत असतील** अशाच उमेदवारांच्या मुलाखती या वेळेस घेण्यात येणार असून सदरची बाब संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच या मुलाखतीसाठी येताना प्रत्येक उमेदवाराचे मूळ सेवापुस्तक, यापुर्वीच्या कॅस अंतर्गत वेतन निश्चीतीची प्रपत्रे (अे.जी.पी. ७०००/अे.एल.११/अे.जी.पी.८०००/अे.एल.१२/अे.जी.पी९०००/अे.एल१३अे), शैक्षणिक पात्रतेची मूळ कागदपत्रे, विद्यापीठाकडून अे.पी.आय. तपासून घेतलेल्या प्रमाणपत्राची मूळप्रत, विद्यापीठ मान्यता पत्र, सेल्फ ॲपरायजल फॉर्म तसेच चेकलिस्ट/व्हेरिफिकेशन फॉर्म भरून त्यावर उमेदवार व प्राचार्यांची स्वाक्षरी घेवून सदरचा फॉर्म चार प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.

कॅसच्या अनुषंगाने प्रस्तावाची फाईल चार प्रतीत तयार करून त्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे तयार करुन त्यावर संबंधित अधिकाऱ्यांच्या (प्राचार्य/आय.क्यु.ए.सी.) स्वाक्षऱ्या घेऊन दिलेल्या तारखेस व वेळेस उमेदवारांस कार्यशाळेसाठी उपस्थित राहाण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

कोव्हीड–१९ च्या अनुषंगाने यापूर्वी शासनाने/महानगरपालिकेने वेळोवेळी जे आदेश निर्गमित केलेले आहेत त्या आदेशांचे पालन करणे सर्व उपस्थितांना बंधनकारक राहील.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव